प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ संवर्गातील बदल्या-२०१९

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः बदल्या-२०१९/प्र.क्र.(५२/१९)/तांशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०५ जुलै, २०१९

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने, प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ संवर्गातील अध्यापकांची खालील स्तंभ-३ प्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अध्यापकाचे नाव व कार्यरत संस्था	बदलीने पदस्थापनेचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४
	प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी		
१	डॉ. गुणवंत ढोमणे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे रिक्त पदावर	विनंती बदली
	सहयोगी प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी		
२	डॉ. वासुदेव विरुळकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे रिक्त पदावर	विनंती बदली
	सहायक प्राध्यापक, उपकरणीकरण अभियांत्रिकी		
३	श्रीमती हर्षा मोकदम, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे श्री. उमेश थोरकर यांच्या प्रशासकीय बदलीने रिक्त होणा-या पदावर	विनंती बदली
४	श्री. उमेश थोरकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे श्रीमती हर्षा मोकदम यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर	प्रशासकीय बदली
	सहायक प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी		
५	श्री. धीरज कपूर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे श्री. मनिष शेटे यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर	प्रशासकीय बदली
६	श्री. मनिष शेटे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे रिक्त पदावर	विनंती बदली
	सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र		
७	श्रीमती निलिमा चव्हाण, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे रिक्त पदावर	विनंती बदली

सहायक प्राध्यापक, अणुविद्युत अभियांत्रिकी			
८	श्रीमती शिल्पा मेश्राम, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे रिक्त पदावर	विनंती बदली
सहायक प्राध्यापक, गणित			
९	श्रीमती पद्मजा गुल्हाने, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे रिक्त पदावर	विनंती बदली

२. प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या अध्यापकांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. विनंती बदली झालेल्या अध्यापकांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदर बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरीत्या होण्याकरीता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे:-

(अ) बदली करण्यात आलेल्या अध्यापकास त्याच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरिता संबंधित संस्थाप्रमुखांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधित अध्यापकाने त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर होऊन त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना व शासनास सादर करावा.

(ब) बदली झालेले अध्यापक संबंधित संस्थेतून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर संबंधित संस्थाप्रमुखांनी त्यांना विनाविलंब रुजू करून घ्यावे. एखाद्या अध्यापकास रुजू करुन न घेतल्यामुळे त्यास विनाकाम वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल.

(क) सदर बदली आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याने, बदली झालेल्या सर्व अध्यापकांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त **दि. १५ जुलै, २०१९ पर्यंतचे** वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत अदा करण्यात यावे. तद्नंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या संस्थेकडून काढण्यात येऊ नये. **दि. १६ जुलै, २०१९ पासूनचे** वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील आहरण व संवितरण अधिका-याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिशः जबाबदार ठरवून पुढील कारवाई करण्यात येईल.

(ड) बदली झालेल्या अध्यापकांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये अन्यथा रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

(इ) बदली झालेल्या अध्यापकांनी, त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नवीन पदस्थापनेवर रुजू व्हावे. जे अध्यापक या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अध्यापकांची अनुपस्थिती “अनधिकृत

अनपस्थिती" म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड होईल, याची जाणीव सर्व संबंधितांना करुन देण्यात येत आहे.

(ई) जे अध्यापक त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचेविरुद्ध तसेच जे संस्थाप्रमुख बदली झालेल्या अध्यापकांना कार्यमुक्त करणार नाहीत त्यांचेविरुद्ध, संचालक, तंत्रशिक्षण यांनी वेळीच प्रशासकीय कारवाई सुरु करावी व आवश्यकतेनुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा. अशा प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व अनुपालन अहवाल शासनास ०१ महिन्यात सादर करावा.

(फ) बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही अध्यापकाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अध्यापक शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०५१५४९२८४६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a0184 21c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f 04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2019.07.05 15:53:17 +05'30'

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित अध्यापक (संबंधित प्राचार्यांमार्फत)

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर/अमरावती/नाशिक.
६. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर/अमरावती/जळगाव/चंद्रपूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/अमरावती/जळगाव/चंद्रपूर.
९. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (तांशि-१).